महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांच्याकरीता पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्तीसाठी पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा- २०१७.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: पोलीस-१११६/प्र.क्र.३४१/पोल-५ अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०४ एप्रिल, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग क्र.पोलीस-१११६/प्र.क्र.३४१/पोल-५अ, दि.१४/६/२०१७
२) शासन परिपत्रक, गृह विभाग क्र.पोलीस-१११६/प्र.क्र.३४१/पोल-५अ, दि.२१/११/२०१७
३) शासन पत्र, गृह विभाग, समक्रमांक दि.१६/२/२०१८

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा २०१७ च्या पूर्व परीक्षेसाठी शासन निर्णय दि.१४/६/२०१७ तसेच मुख्य परीक्षेसाठी शासन परिपत्रक दि.२१/११/२०१७ प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर शासन परिपत्रकात मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरण्यात येणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील ३२२ रिक्त पदांसाठी प्रवर्गनिहाय आरक्षण दर्शविण्यात आले आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ प्रकरणी दि.४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये दि.२५/५/२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदरहू निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वर मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती “जैसे-थे” ठेवण्याबाबत कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत मागासवर्गीय प्रवर्गांसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू नाही.

२. पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा ही पदोन्नतीची परीक्षा असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पदोन्नतीमधील आरक्षणासंदर्भात दिलेल्या उपरोक्त निर्णयानुसार, या परीक्षेसाठी आरक्षण लागू नाही. सबब, उपरोक्त वाचा (१) व (२) येथे नमुद शासन निर्णय / परिपत्रकान्वये जाहिर करण्यात आलेली पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा २०१७ द्वारे भरण्यात येणारी पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील ३२२ पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुरु असलेल्या निवड प्रक्रियेतील या पुढील टप्पे आरक्षणाचा विचार न करता गुणवत्तेनुसार पूर्ण करण्यात यावेत.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०४०४१८१४५७७७२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

V. M. Bhat

Digitally signed by V. M. Bhat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, cn=V. M. Bhat
Date: 2018.04.04 18:17:29 +05'30'

(व्यं.मा.भट)
उप सचिव, गृह विभाग

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, (सेवा) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
२) सचिव (साविस) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने)
४) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई